
आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




महामाया कालिका देवस्थानात ४ रोजी वसंत पंचमी व नववंडी
पान ३ वर



बीबीएलमध्ये विराट खेळणार?
पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 209 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 2 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# स्मार्ट सिटीच्या रखडलेल्या कामांवर काँग्रेस, आप आक्रमक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १ : काँग्रेसने मंगळवारी इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडला पावसाळ्यापूर्वी सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा इशारा दिला आहे. अन्यथा, निष्काळजीपणा आणि सार्वजनिक निधीच्या गैरवापराच्या आरोपांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पक्षाने दिला आहे.**

इमॅजिन पणजीच्या अधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालात, पणजी काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष प्रतिभा बोरकर यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने या प्रकल्पातील भ्रष्टाचार आणि अनियमितता उघड करण्याचा निर्धार केला आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि फसवणूक होत आहे. त्यामुळे या प्रकल्पांची स्वतंत्र तपासणी केली जावी असे त्या म्हणाल्या.

काँग्रेसने इमॅजिन पणजीकडून प्रकल्पांसाठी आतापर्यंत झालेल्या खर्चाचा तपशील, पूर्ण झालेल्या व प्रलंबित कामांचा अहवाल आणि पुढील प्रकल्पांसाठी निश्चित वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी केली आहे. निकृष्ट दर्जाच्या कामांसाठी जबाबदार असलेल्या कंत्राटदारांवर कारवाई करावी, त्यांना काळ्या यादीत टाकावे आणि नागरिकांसमोर स्पष्ट माहिती द्यावी, अशी काँग्रेसची भूमिका आहे.





पणजीची सद्यस्थिती हे भाजप सरकारच्या अपयशाचे ज्वलंत उदाहरण आहे. पावसाळा तोंडावर असताना, या प्रकल्पातील विलंब आणि नियोजनशून्यता नागरिकांसाठी गंभीर समस्या निर्माण करत आहे. सरकारी यंत्रणांच्या या निष्क्रियतेमुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असून सामान्य नागरिकांच्या अडचणींना कुणीही गांभीर्याने घेत नाही, असा आरोप बोरकर यांनी केला.

बोरकर पुढे म्हणाल्या की, डबल इंजिन सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. १४ ऑक्टोबर २०१५ रोजी जेव्हा हे स्वप्न दाखवण्यात आले, तेव्हापासून पणजीकरांना अपूर्ण प्रकल्प, तुटलेले रस्ते आणि निकृष्ट पायाभूत सुविधा यांचेच दुःस्वप्न भोगावे लागत आहे. या प्रकल्पात 'स्मार्ट' जर काही असेल, तर तो म्हणजे जनतेच्या पैशांची लूट आहे.

आम आदमी पक्ष (आप) आणि पणजीतील रहिवाशांनीही स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अपूर्ण कामांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आप गोवा अध्यक्ष अमित पालेकर यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की, इमॅजिन पणजी न्यायालयाने दिलेल्या मुदती पूर्ण करण्यात अपयशी ठरले आहे. चार वर्षांपूर्वीच हे प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र, विकासाचे कोणतेही संकेत शहरात दिसत नाहीत, असा आरोप त्यांनी केला.

सांत इनेजमधील रस्ते अद्याप पूर्ण
पान २ ▶

## दक्षिण गोव्यात भटक्या कुत्र्यांसाठी निर्जंतुकीकरण शिबिर सुरू

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १** : दक्षिण गोव्यातील किनारी भागातील भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि त्यासोबत उद्भवणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी २०२५ कोस्टल बेल्ट निर्जंतुकीकरण शिबिर मंगळवारी कोलवा येथील मत्स्यव्यवसाय उपकार्यालयात अधिकृतपणे सुरू करण्यात आले. हा उपक्रम मिशन रेबीज, वर्ल्डवाइड व्हेटर्नरी सर्व्हिसेस आणि सरकारी विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने १९ एप्रिलपर्यंत राबविला जाणार आहे.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बाणावलीचे आमदार वेन्झी व्हिएगस यांनी या उपक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. त्यांनी भटक्या कुत्र्यांच्या समस्येच्या निराकरणासाठी आतापर्यंत केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आणि सातत्यपूर्ण उपक्रमांद्वारे यामध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

केळशीचे सरपंच डिक्सन वाझ यांनीही या उपक्रमाचे स्वागत करत किनारपट्टी भागात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि कुत्र्यांच्या हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली. अलिकडच्या काही महिन्यांत किनारी भागात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. पर्यटकांवरील हल्ल्यांचे प्रमाणही वाढल्याने हा उपक्रम अत्यंत गरजेचा होता, असे त्यांनी सांगितले. तसेच, त्यांनी पशुसंवर्धन आणि पर्यटन विभागाचे या मोहिमेसाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले.

या मोहिमेचा निर्णय फेब्रुवारी महिन्यात दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात कुत्र्यांच्या चाव्याच्या ८४० घटना नोंदविल्यानंतर घेण्यात आला. बाणावली, बेतालभाटी , कोलवा आणि केळशी या भागांना प्राधान्य देऊन ही मोहीम राबवली जात आहे. मिशन रेबीज टीमकडून कुत्र्यांच्या वर्तनाविषयी आणि कचरा व्यवस्थापनाविषयी जनजागृती सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. याशिवाय, हॉटेल्समध्ये पत्रके वितरित केली जाणार असून समुद्रकिनाऱ्यांवर जनजागृतीसाठी होर्डिंग्ज लावण्यात येणार आहेत. हा उपक्रम संपूर्ण गोव्यातील मोठ्या प्रयत्नांचा एक भाग असून, सुमारे २००० भटक्या कुत्र्यांना निर्जंतुकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट आहे. उत्तर गोव्यातील कांदोळी, कळंगुट, बागा, हरमल , ओझरान आणि वागातोर या भागांमध्येही अशीच मोहीम राबवली जाणार असून, कुत्र्यांना प्रक्रियेसाठी असागाव येथील केंद्रात नेण्यात येईल.यापूर्वी, डब्ल्यूव्हीएसने फातोर्डा मतदारसंघात यशस्वी निर्जंतुकीकरण मोहीम राबवली होती, ज्याला स्थानिक प्रशासन आणि नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता.

## ५१ बेकायदा बांधकामे ३ महिन्यांत हटवा

▶ न्यायालयाचे कडक आदेश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १** : राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी ५१ बेकायदेशीर बांधकामे पाडण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने कडक इशारा दिला आहे. मंगळवारी दिलेल्या निर्देशानुसार, संबंधित अधिकाऱ्यांना पुढील तीन महिन्यांत ही बांधकामे हटवण्याचे तसेच सुकूर, गिरी आणि सांगोल्डा येथील सखल भातशेती मूळ स्थितीत आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

गेल्या चार वर्षांपासून सरकारी यंत्रणेकडून न्यायालयाच्या आदेशांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. प्रशासन विविध कारणे पुढे करत कारवाई टाळत होते. सुनावणीदरम्यान, सरकारी वकिलांनी न्यायालयाला माहिती दिली की, संबंधित क्षेत्रातील अतिक्रमण हटवण्यासाठी आणि जमिनीचे पुनर्संचयन करण्यासाठी ६९ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पीय मंजुरीची प्रतीक्षा केली जात आहे.

हरिहर चोडणकर आणि ॲव्हर्टिनो मिरांडा यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना, उच्च न्यायालयाने मार्च २०२१ मध्ये उत्तर गोवा जिल्हाधिकारी आणि बार्देश उपजिल्हाधिकारी,म्हापसा यांनी २७ जून २०१९ आणि २६ मे २०२० रोजी दिलेल्या आदेशांची दखल घेतली. गोवा जमीन महसूल संहिता, १९६८ च्या कलम ३३ (३) अंतर्गत हे आदेश दिले गेले होते. न्यायालयाने स्पष्ट केले की, पहिल्या दृष्टीक्षेपात अनधिकृतपणे भातशेती क्षेत्रात माती टाकून अतिक्रमण करण्यासंदर्भात हे आदेश महत्त्वपूर्ण आहेत.

सेरुला कोमुनिदादचे प्रतिनिधित्व करणारे ॲड. वाय. व्ही. नाडकर्णी यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, संबंधित बेकायदेशीर बांधकामे अद्याप सुरूच आहेत. सरकारी वकील पी. अरोलकर यांनी न्यायालयाला आश्वासन दिले की, आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील. ऑगस्ट २०२३ मध्ये न्यायालयाने प्रशासकीय न्यायाधिकरणाला निर्देश दिले होते की, संबंधित प्रलंबित अपीलांचा निकाल सहा महिन्यांच्या आत निकाली काढावा. तसेच, सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस कृती आराखडा सादर करण्यास सांगितले होते. मात्र, सरकारी अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई न केल्यामुळे याचिकाकर्त्यांनी पुन्हा न्यायालयाकडे धाव घेतली. यासंदर्भात न्यायालयाने आता स्पष्ट निर्देश दिले असून, पुढील तीन महिन्यांत बेकायदेशीर बांधकामे हटवून जमीन मूळ स्थितीत आणण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर टाकली आहे.

## स्मार्ट सिटी प्रकल्पाचे ९०% काम पूर्ण झाल्याचा इमॅजिन पणजीचा दावा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १ : स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंतिम मुदतीत ३१ मार्चपर्यंत पूर्णता साध्यण्यात अपयश आल्यानंतरही, इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडने ९०% काम पूर्ण झाल्याचा दावा केला आहे. तसेच, सुरू असलेल्या इतर कामांचा स्मार्ट सिटी मिशनशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.**

**विरोधक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत, इमॅजिन पणजीचे व्यवस्थापकीय संचालक संजित रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, एमजी रोड, १८ जून रोड आणि पांडुरंग पिसुर्लेकर रोडवरील कामे मूळत: स्मार्ट सिटी मिशनचा भाग नव्हती, तर ती विद्यमान केंद्रीय ड्रेनेज समस्यांमुळे उभारली जात आहेत. या प्रकल्पांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. आम्ही आतापर्यंत ९०% काम पूर्ण केले आहे आणि मध्य पणजीत ताडमाड वृक्षारोपण वगळता कुठेही खंदक, खोदकाम किंवा बॅरिकेडिंग शिल्लक नाही. जर असे कुठे दिसत असेल, तर ते स्मार्ट सिटी अंतर्गत येत नाही, असे रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले.**

**इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडने उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रकल्प पूर्ण करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे.**



**२७ जानेवारी २०२५ रोजी सादर केलेल्या शपथपत्रानुसार, मध्य पणजीतील रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार लँडस्केपिंगचे काम १ जून २०२५ पासून सुरू होईल आणि ३० जून २०२५ पर्यंत पूर्ण केले जाईल, असे रॉड्रिग्ज यांनी सांगितले.**

**मध्यवर्ती भागातील भूमिगत युटिलिटी लाईन्स, फायबर नेटवर्क केबल्स आणि जुन्या ड्रेनेज प्रणालीमुळे उभ्या राहिलेल्या अडथळ्यांविषयी बोलताना, रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले की या समस्या कमीत कमी व्यत्ययाने सोडवण्यात आल्या आहेत. सर्व ड्रेनेज अडथळे दूर करण्यात आले असून, अखंड सेवा सुनिश्चित केली गेली आहे, असे त्यांनी नमूद केले.**

**सांत–इनेज रस्त्याबाबत माहिती देताना, त्यांनी स्पष्ट केले की २,८०० मीटरचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, सखोल खोदकामाची आवश्यकता असल्याने उर्वरित भागासाठी अधिक वेळ लागणार आहे. तसेच,रायबंदर फेरी रॅम्पचे काम ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होईल आणि कचरा साफसफाई प्रक्रिया सध्या सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.**

**रुआ दो ओरेम प्रकल्पाच्या प्रलंबित स्थितीबाबत त्यांनी सांगितले की, सांडपाणी पंपिंग लाईनच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कराराची वाट पाहिली जात आहे. या प्रकल्पासंदर्भात सरकारला अवगत करण्यात आले आहे आणि रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यापूर्वी पुढील प्रक्रिया सुरू केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**

**इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडने स्पष्ट केले की पूर्ण झालेल्या रस्त्यांना पाच वर्षांची वॉरंटी देण्यात आली आहे. ३१ मे २०२५ पूर्वी आवश्यक तोडगा निघाल्यानंतर अंतिम डांबरीकरणाचा थर टाकला जाईल, असे रॉड्रिग्ज यांनी सांगितले. तसेच, मुदती चुकवल्याचा आणि काम अपूर्ण असल्याचा आरोप फेटाळून लावला.**

## निवडक

### 'पीएफ'मधून ५ लाख काढता येणार

नवी दिल्ली, दि. १ : घर, लग्न, शिक्षण आणि आरोग्यावरील खर्चासाठी भविष्य निर्वाह निधीतील रक्कम मुदतपूर्व काढण्याची मर्यादा पाच लाख रुपये केली आहे. ही मर्यादा पूर्वी एक लाख होती. यामुळे अडचणीच्या काळात आपला हक्काचा पैसा कर्मचाऱ्यांना वापरता येणार आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीच्या (सीबीटी) कार्यकारी समितीची ११३ वी बैठक जम्मू आणि काश्मीर येथे गेल्या आठवड्यात पार पडली. या बैठकीनंतर कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या सचिव सुमीता डावरा यांनी ऑटो सेटलमेंट ॲडव्हान्स क्लेमची मर्यादा १ वरून ५ लाख करण्याची शिफारस केली. 'सीबीटी'ची मोहर उमटल्यानंतर याची अंमलबजावणी होईल. एप्रिल २०20 मध्ये पीएफ खात्यातील रक्कम आजारपणासाठी काढण्याची मुभा देण्यात आली. त्यानंतर मे २०२४ मध्ये रक्कम काढण्याची मर्यादा ५० हजारांवरून एक लाख रुपये करण्यात आली. पुढे शिक्षण, घर, लग्न या कारणांसाठीही रक्कम काढण्याची मुभा देण्यात आली. हे क्लेम तीन दिवसांत मंजूर केले जातात.

-------------

### गुजरातमध्ये स्फोट; १८ जणांचा मृत्यू

सूरत, दि. १ : गुजरातच्या बनासकांठामध्ये एका फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला. या स्फोटात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कारखान्यातील बॉलटर फुटल्याने हा स्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेवेळी कारखान्यात ३० कामगार काम करत होते. स्फोटानंतर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाकडून प्रयत्न सुरू आहेत. ढिगाऱ्याखाली अनेक कामगार अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. बनासकांठाचे जिल्हाधिकारी मिहिर पटेल यांनी सांगितले की, मंगळवारी सकाळी आम्हाला डीसाच्या औद्योगिक क्षेत्रात स्फोट झाल्याची माहिती मिळाली. अग्निशामक दलाने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवले. आतापर्यंत कारखान्यातील ढिगाऱ्यातून १८ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. संपूर्ण आरसीसी स्लॅब कोसळला आहे. मदत पथके ढिगारा काढत आहेत. पोलिस तपास सुरू आहे.

---------------

### युट्यूबर रणवीरला न्यायालयाचा दणका

अलाहाबाद, दि. १ : प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादिया याला सर्वोच्च न्यायालयाने एक धक्का दिला आहे. रणवीर अलाहाबादियाने पासपोर्टची मागणी केली होती. मात्र, ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे सध्या तरी रणवीर अलाहाबादियाला पासपोर्ट मिळणार नाही. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी आता दोन आठवड्यांनी होणार आहे. गुवाहाटी, मुंबई आणि जयपूरमध्ये रणवीर अलाहाबादियाच्या विरुद्ध दाखल झालेल्या एफआयआरमध्ये अटकेपासून संरक्षण देण्याच्या अंतरिम आदेशाची मुदत न्यायालयाने वाढवली आहे. दरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आज सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं की, या प्रकरणाची चौकशी दोन आठवड्यात पूर्ण होईल. दरम्यान, तोपर्यंत रणवीर अलाहाबादियाला पासपोर्ट देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. तसेच सर्वोच्च न्यायालयाने रणवीर अलाहाबादियाला दोन आठवड्यांनी येण्यास सांगितलं.

### हवामान

कमाल : ३४ किमान : २४
आर्द्रता : ६४

### बाजार भाव

सोने : ₹ ९३,६७० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०५००० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७६,०२४ .७७↑ (२१.१६ )
निफ्टी : २३,१६५.४० ↑ (८३.९५)